संगणक संकेतांक नं.- 201212041529132242

पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा शुल्कात वाढ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांक:- एसपीई-२०११/(५९/११)/साशि-१**

मंत्रालय विस्तार भवन मुबंई, ४०००३

**दिनांक :-**३.१२.२०१२

**वाचा :-** १) शालेय शिक्षण व सेवायोजना विभाग शासन निर्णय क्रमांक.
एसपीई-१०९९/२१४६९/(२६९/९९)/साशि-१ दिनांक. २९.७.२००२
२) आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे पत्र क्र.-
मरापप/शिष्यवृत्ती/२०११/२८५१, दिनांक.१३.५.२०११

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदे मार्फत घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांचे शुल्क दर पाच वर्षांनी १० टक्के वाढविण्यास संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार परीक्षा परिषदेने सन २००८ साली पूर्व माध्यमिक/माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा शुल्कामध्ये वाढ केलेली आहे. तथापि, परीक्षा आयोजनाचा खर्च, वाढलेली महागाई व सर्व स्तरावरुन प्रशासकीय खर्चात झालेली वाढ तसेच परीक्षा परिषदेचे परीक्षा शुल्क हे एकमेव उत्पनाचे साधन असल्याने पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या शुल्कदरात वाढ करणेबाबत आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, यांच्या संदर्भ २ च्या पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u> :-** आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी त्यांच्या संदर्भ क्र.२ वरील पत्रान्वये केलेल्या शिफारशीनुसार पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या शुल्कात पुढीलप्रमाणे वाढ करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| शुल्काचा प्रकार | पूर्व माध्यामिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा | | माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा | |
|---|---|---|---|---|
| | बिगर मागास विद्यार्थी | मागास विद्यार्थी | बिगर मागास विद्यार्थी | मागास विद्यार्थी |
| आवेदनपत्र शुल्क | रुपये १०/- | रुपये १०/- | रुपये १०/- | रुपये १०/- |
| परिक्षा शुल्क | रुपये ५०/- | नाही | रुपये ५०/- | नाही |
| विलंब शुल्क (३० दिवसापर्यंत) | रुपये ५०/- | रुपये ५०/- | रुपये ५०/- | रुपये ५०/- |
| अतिविलंब शुल्क | इतर शुल्का व्यतिरिक्त (आवेदनपत्र परिक्षा, विलंब प्रतिदिनी रु.१०/-) | | इतर शुल्का व्यतिरिक्त (आवेदनपत्र परिक्षा, विलंब प्रतिदिनी रु.१० /-) | |
| व्दितीय प्रमाणपत्र/गुणपत्रक | रुपये ५०/- | | रुपये ५०/- | |
| शाळा संलग्नता शुल्क | रुपये २००/- (पूर्व माध्यमिक, माध्यमिक व NTS परीक्षा मिळून) | | | |

वरील सुधारित परीक्षा शुल्काचे दर २०१४ मध्ये घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षे पासून लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र.प्र.आटे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय उपसंचालक
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
सर्व शिक्षण निरिक्षक बृन्हमुंबई
मा.अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण),
निवड नस्ती-साशि-१

D:\manisha\G.R\G.R-2012 59.11-Scolarship fee